Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg.No. MAH / 12-83 / Aurangabad F - 985

Volume - 6 No. : 3 Issue - 18 Dec.2018 ISSN No. :2347-9639

36 Years


UGC Approved Journal No.64299

# VICHAR MANTHAN

IIJIF Impact Factor 2.283

National Research Journal of Political Science and Public Administration
(Peer Reviewed Journal)

## Maharashtratil Sthityantare



# विचार मंथन

## महाराष्ट्रातील स्थित्यंतरे

मुख्य संपादक - प्राचार्य डॉ. पी.डी. देवरे
संपादक - डॉ. प्रमोद पवार | डॉ. मनोहर पाटील

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Shivaji College Hingoli, Dist. Hingoli

36 Year's
Maharashtra Political Science & Public Administration Conference

# VICHAR MANTHAN

National Research Journal of Political Science and Public Administration
(A Peer Reviewed Journal)
Vol. - 6 , No - 3 Issue - 18 December, 2018 ISSN- 2347-9639

♦ Chief Editor / President ♦
Prin. Dr. P. D. Deore
11, Shri Samarth Appartment, Chitrangan Soc., Savarkar Nagar, Gangapur Road, Nashik-13 Mob : 9423980457

♦ Editor ♦
Prin. Dr. Pramod Pawar
Dhandai College, Amalner Dist. Jalgaon
Email- pramodpawar1761@gmail.com Mob:9423582073

♦ Editor / Secretary ♦
Prin. Dr. Manohar Patil
S.S.V.P.S College, Dhule
Email-manoharpatil123@gmail.com Mob:9422287053

♦ Advisory Editors ♦
Dr. Vitthal More (Latur)
Dr. Mohan Kashikar (Nagpur)
Dr. Bharati Patil (Kolhapur)
Dr. Prakash Pawar (Kolhapur)
Dr. Rajeshwari Deshpande (Pune)
Dr. Liaqat Khan (Mumbai)
Dr. Ashok Naikwade (Aurangabad)
Prof. Urmila Chavhan (Meeraj)
Dr. Manik Sonawane (Pune)
Dr. Sanjay Gore (Gadchiroli)
Dr. Pyarelal Suryawanshi (Amravati)
Dr. Pramod Shambharkar (Chandrapur)
Mr. Vitthal Dahiphade (Nanded)
Dr. Vakil T. Shaikh (Koradi-Nagpur)
Dr. Sanjay Wagh (Mumbai)
Dr. Suresh Bhalerao (Parbhani)
Dr. Sachin Patil (Sangali)
Dr. Kusum More (Latur)
Dr. Alka Deshmukh (Nagpur)
Dr. Vasanti Rasam (Kolhapur)
Dr. Balasaheb Bhosale (Tasgaon)
Dr. Bal Kamble (Karjat-Pune)
Dr. Chaitra Redkar (Mumbai)
Dr. Prashant Amrutkar (Aurangabad)
Dr. Sunil Shinde (Parbhani)
Dr. Jyotsna Sonkhaskar (Nashik)
Dr. Nandaji Satpute (Gadchiroli)
Dr. Vinod Gaikwad (Shegaon)
Dr. Sandeep Kale (Selu-Vardha)
Dr. Meera Phad (Nanded)
Mr. Dattatray Wabale (Pune)
Mr. Mahesh Birhade (Raigad)
Dr. Hanumant Phatak (Baramati-Pune)
Dr. Prashant Vighe (Paratwada-Amrawati)

♦ Hon'ble Guest Editors ♦
Dr. Sushama Yadav (New Delhi)
Dr. Subhash Chandrakar (Raipur)
Dr. Anita Deshpande (Bhopal)
Dr. Sunilkumar Goyal (Khandwa)
Dr. J. Prabhash (Kerala)
Dr. B. Chandrashekhar (Hydrabad)
Dr. Sanjeevkumar Sharma (Meerut)
Dr. Shilpi Bose (Raipur)
Dr. Garima Jawualkar (Bhopal)
Dr. Ketan Govekar (Panji-Goa)
Dr. Shaikh Abul Barkat (Hydrabad)

♦ Editing Assists ♦
Dr. Sambhaji Patil (Shindkheda)
Asst. Prof. Gautam Bhalerao (Jalgaon)
Asst. Prof. Sanjay Patil (Chopada)
Asst. Prof. Ganesh Chavhan (Muktainagar)
Asst. Prof. Viqar Shaikh (Jalgaon)
Asst. Prof. Jawed Tadavi (Jalgaon)

♦ Managing Editor ♦
Mr. Yuvraj Mali

Maharashtra Political Science and Public Administration Conference
Reg. No. MAH/12-83/Aurangabad-F-985
Visit Us :-www.mpspa.com E-mail : vicharmanthanjournal@gmail.com

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

- सत्यशोधक चळवळ आणि महाराष्ट्राचा सामाजिक विकास ........ ६३
  - डॉ. शुभदा ठाकरे, धुळे
- दलित चळवळ - एक विश्लेषणात्मक अभ्यास ........ ६६
  - डॉ. संभाजी संतोष पाटील, शिंदखेडा
- महाराष्ट्रातील रिपब्लीकन चळवळीचे सर्वसमावेशक धोरण ........ ८०
  - प्रा. ई. एस. गेडाम, नवापूर
- राखीव जागा समर्थकांची भूमिका ........ ८४
  - प्रा. डॉ. मनिषा अनिल कचवे, धुळे
- आरक्षण आणि राजकारण ........ ८७
  - डॉ. काळे संजय अंकुश, नाशिक
- हिंदू राष्ट्रवादाची जडण-घडण : ऐतिहासिक वास्तव ........ ९३
  - किशोर बेडकीहाळ, सातारा
- समकालीन स्थित्यंतरे आणि स्त्री चळवळीपुढील आव्हाने ........ ९९
  - डॉ. चैत्रा रेडकर, मुंबई
- महिला सबलीकरण : विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य ........ १०५
  - प्रा. डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे, म्हसदी, ता. साक्री
  - प्रा. डॉ. पंडित उत्तम नेरपगार, साक्री
- महाराष्ट्रातील महिला सबलीकरण आणि राजकीय सहभाग ........ १०९
  - प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे, मारवड, ता. अमळनेर
- महाराष्ट्रातील महिला सबलीकरण ........ १११
  - सहा. प्रा. नासीर कासम शेख, सवना, ता. महागांव
- महाराष्ट्रातील महिला सबलीकरण ........ ११३
  - दिलीप हरसिंग राठोड, पारोळा
- महाराष्ट्रातील महिला सबलीकरण - एक अभ्यास ........ ११६
  - प्रा. डॉ. सुखनंदन ढाले, हिंगोली
- Peasant Movement in Marathi Speaking Belt ........ 120
  - Vaishali Prakash Pawar, Pune
- Development Management of Cities of Western Maharashtra : A Case Study ........ 133
  - Dr. Vaibhav R. Suryawanshi, Bhor
- Social and Political Reformers on Maharashtra ........ 137
  - Assit. Prof. Dr. Nikam Raju Parbhat, Chalisgaon
- Indian Politics and Women's Empowerment ........ 139
  - Dr. H. T. Kurkute, Sangamner
- Present Scenario of Dalit Politics in Maharashtra ........ 143
  - Dr. Sidharth B. Sawant, Shindkheda
- R. N. Chavan's Views on Women ........ 146
  - Dr. Vaishali Prakash Pawar, Pune
- Education and its Impact on Regionalism in District Farrukhabad of U.P. ........ 150
  - Dr. Mohd Akram


•••

Shivaji College Hingoli Dist. Hingoli
PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

Vichar Manthan (A Peer Reviewed Journal) ISSN - 2347-9639 Vol- 6 No-3 Issue-18 December 2018

# महाराष्ट्रातील महिला सबलीकरण – एक अभ्यास

– प्रा. डॉ. सुखनंदन डाले
राज्यशास्त्र विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

### प्रस्तावना

महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही विसाव्या शतकात गतिमान बनली असली तरी या प्रक्रियेची सुरूवात काही शतकापूर्वी झाली आहे. अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि फ्रेंच व्यक्तिस्वातंत्र्याचा जाहीरनामा यामध्ये महिला सबलीकरण प्रक्रियेचे पहिले प्रतिबिंब पडल्याचे दिसते. या दोन्ही जाहीरनाम्यामध्ये स्त्री आणि पुरूषासाठी समान अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे. १८ व्या शतकामधील साहित्यकृती मधून महिला अधिकाराचा पुरस्कार केला आहे. १७९२ मध्ये प्रकाशित झालेले मेरी वुलस्टोन क्राफ्टचे, ''व्हिन्डीकेशन ऑफ द राईटस ऑफ वुमेन'' हे पुस्तक म्हणजे महिला सबलीकरणाचा पुरस्कार करणारी पहिली साहित्यकृती होय. एकोणिसाव्या शतकामध्ये कॅंडी स्टॅनहोन, विल्यम थॉम्पसन, हॅरियट टेलर, जॉन स्टूअर्ट मिल यासारख्या साहित्यिकांनी, विचारवंतानी स्त्री मुक्तीचा विचार तत्कालीन समाजामध्ये रूजवण्याचा प्रयत्न केला.[१]

भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी महात्मा जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे आदी समाजसुधारकांनी स्त्रियांच्या गुलामगिरीविरूद्ध आवाज उठवून महिलांना पुरूषाच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रामध्ये समान अधिकाराची मागणी केली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर आणि प्रामुख्याने १९६०च्या दशकामध्ये महिला सबलीकरणाची प्रक्रिया गतिमान झाली. महिलांच्या अधिकाराचा मुलभूत मानव अधिकारामध्ये समावेश करण्यात आला. महिला सबलीकरणाची जाणीव वैश्विक बनविण्यात संयुक्त राष्ट्रसंघटनेचे योगदान महत्वाचे आहे. भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळात महिला सबलीकरणाचे प्रयत्न होत आहेत. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात याविषयी सातत्याने उपाययोजना केल्या जात आहे. त्यातून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण होत आहे.

### महिला सबलीकरणाचा अर्थ

महिला सबलीकरण म्हणजे स्त्रियांचे अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक सामर्थ्य वाढवणे आणि त्यांच्यामध्ये स्वतःच्या क्षमता विषयी आत्मविश्वास विकसित करणे होय. महिला सबलीकरणाचा एक संकल्पना, प्रक्रिया आणि चळवळ म्हणून उल्लेख होतो. स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी ती एक संकल्पना आहे. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने विकासाच्या आणि प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणारी ही प्रक्रिया आहे. लिंगभेदावर आधारीत विषम समाजरचना नष्ट करून स्त्री-पुरूष समानतेवर आधारीत नवी व्यवस्था निर्माण करणारी आंतरराष्ट्रीय चळवळ आहे. महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही महिलांच्या विकासाशी संबंधित असणारी प्रक्रिया आहे. अबला महिलांना सबला करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रांमध्ये समान संधी उपलब्ध करून देणे हे महिला सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे.

### भारतातील महिला सबलीकरण

भारतात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरूवात राजा राममोहन रॉय यांच्या कार्यापासून झाली. त्यांनी स्त्री-पुरूष समता, स्त्री-शिक्षण, स्त्रीयांचे हक्क यावर भर देऊन सतीप्रथेला विरोध केला व त्यांच्या प्रयत्नामुळेच ब्रिटिश सरकारने इ.स. १८२९ मध्ये सतीप्रथा बंदी कायदा केला होता.[२] राजा राममोहन रॉय यांनी बालविवाह पद्धतीस विरोध केला होता आणि विधवा विवाहाचे समर्थन केले होते. तसेच त्यांनी बहूपत्नीत्व पद्धतीला विरोध करून स्त्रीयांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले. याच काळात १८११ मध्ये एडवर्ड मुर यांनी ''हिंदू इन फार्ट साइड रे'', १८१५ मध्ये जॉन फास्मेकने 'अकाउंट ऑफ द ॲबॉलिशन ऑफ फिमेल इनकरिसाइड इन गुजरात' आणि १८२९ मध्ये जेम्स रॉडने 'ॲनॅल्स अँड ऑक्सियन ऑफ राजस्थान' ही पुस्तके लिहीली आणि यामध्ये त्यांनी भारतातील लहान मुलीची हत्या व महिलांची स्थिती याविषयी गांभीर्याने विचार मांडले होते. त्यामुळे या प्रश्नाकडे ब्रिटिश शासनाचे लक्ष वेधले गेले. तसेच वाराणसीचा रेसिडेंट, डंकन, कॉर्नवालिस, शोअर, पुर हून जॉन, स्ट्रेंची यांच्या प्रयत्नामुळे ५ एप्रिल १८७४ रोजी एक विधेयक मंजूर करण्यात आले. यामुळे येथील महिला चळवळीला एक दिशा मिळाली.[३]

### महाराष्ट्रातील महिला सबलीकरण

महाराष्ट्र राज्य हे देशातील पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. या राज्यामध्ये स्त्रियांना समान दर्जा प्राप्त व्हावा आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण व्हावे यासाठी स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात प्रयत्न झाल्याचे दिसुन येते. याविषयीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

### स्वातंत्र्यपुर्व काळातील महाराष्ट्रातील महिला सबलीकरण

महाराष्ट्रात स्त्रीयांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी इ.स.१८४८ मध्ये पुणे येथे मुलींची शाळा सुरू केली.४ अस्पृश्य मुला-मुलींसाठी शाळा सुरू केल्या. विधवा विवाहास प्रोत्साहन व चालना दिली. परित्यक्ता स्त्रियांना आश्रय दिला आणि सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला.[४] स्त्रियांच्या दृष्टीने जोतीबा फुले भारतातल्या स्त्री-मुक्ती चळवळीचे संस्थापक होते असे मानले जाते. जूनी पितृसत्ताक कुटुंबसंस्था नष्ट करून नवीन समताधिष्ठित कुटुंबसंस्था प्रस्थापित करण्याचे प्रयत्न जोतीबा फुले यांनी अनेक वर्षापूर्वी केले होते. महात्मा जोतीराव फुले यांच्यानंतर कोल्हापूर

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

...राजर्षी शाहू महाराजांनी महिला व मुलींच्या विकासासाठी ... एकूणच सामाजिक परिवर्तनावर भर दिला. त्यासाठी प्रत्यक्ष ... करून त्याची सुरूवात स्वत: पासून केली. वर्षानुवर्षे चालत आलेली आणि धर्ममान्य बनलेली बालविवाह प्रथा बंद केली. यासाठी १२ जुलै १९१९ रोजी विवाहासंबंधीचा कायदा केला. या कायद्याने मुलीचे लग्नाचे वय १४ वर्षे व मुलाचे वय १८ वर्ष असे केले. समाजातील जातीभेद संपुष्टात आणण्यासाठी आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. आंतरजातीय विवाहाला कायद्याने मान्यता दिली नाही तर या कायद्याला कृतीत आणण्यासाठी स्वत: पुढाकार घेतला. १९१७ मध्ये विधवा विवाहास प्रोत्साहन देणारा कायदा केला. ११ जुलै १९१९ ला काडीमोड कायदा केला. ख्रिश्चन, पारसी समाज सोडून अन्य सर्व जाती जमातींना हा कायदा लागू केला.[६] अनौरस संतती व जोगतिनी संबंधी १७ जानेवारी १९२० रोजी कायदा केला.[७] तत्कालीन समाजव्यवस्थेने वेगवेगळ्या कारणांनी काढून घेतलेली महिलांची प्रतिष्ठा परत देण्याचा हा अतिशय पुरोगामी प्रयत्न होता.राजर्षी शाहु महाराजांनी समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्त्रीला सबला बनविण्याचा प्रयत्न केला. स्त्री, तिचे शिक्षण, विवाह, आरोग्य, पुर्नविवाह, घटस्फोट घेण्याचे स्वातंत्र्य, अश्लिल व अनिष्ठ प्रथापासून सुटका, स्त्री स्वावलंबन इत्यादी स्तरावर त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहे.

न्यायमुर्ती रानडे यांनी आपली पत्नी रमाबाई रानडे यांना लग्न झाल्यानंतर शिकवायला सुरूवात केली. रमाबाई रानडे यांनी नंतर पुण्यात मुलींच्या शिक्षणासाठी शाळा व इतर अनेक उपक्रम सुरू केलेत. गोपाळराव जोशी यांनी पोस्टात नोकरी करीत असतांनाच आपली पत्नी आनंदीबाई यांना शिक्षणासाठी सर्व प्रकारचे सहकार्य केले. त्यांनी अमेरिकेत वैद्यकिय शिक्षण पूर्ण केले. या महाराष्ट्रातील पहिल्या महिला डॉक्टर आहेत. गोपाळ गणेश आगरकर यांनी महिलांच्या सबलीकरणासाठी कुटुंब नियोजन, विवाह वय, शिक्षण यासंबंधी पुरोगामी व प्रगतीशील विचार मांडले व पुरस्कार केला.[८]

१८९६ मध्ये महर्षी अण्णा केशव कर्वे यांनी पुणे येथे 'अनाथ बालिकाश्रम' या संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेच्या पुणे, सातारा, वाई, रत्नागिरी या परिसरात शैक्षणिक शाखा आहेत आणि त्यात हजारो विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत. महर्षी कर्वे नेहमी म्हणत असत, ''स्त्री शिक्षणाच्या कार्याची लांबी, रूंदी, खोली वाढविण्याच्या मदत कार्यासाठी मी आपले जीवन अर्पण करीन, अशी आपल्या मनाची तयारी असली पाहिजे. या कार्यासाठी पुन्हा जन्म घेऊन यावे अशी माझी इच्छा आहे.''[९]

१९१५ मध्ये जपानमधील स्त्रियांच्या विद्यापीठाची माहिती देणाऱ्या एका पुस्तिकेच्या प्रेरणेने त्यांनी १९१६ मध्ये मुंबई येथे महिला विद्यापीठाची स्थापना केली. श्रीयूत ठाकरसी यांच्या देणगीतून विद्यापीठ उभे राहिल्याने या विद्यापीठास 'श्रीमती नाथीबाई दामोधर ठाकरसी महिला विद्यापीठ' असे नाव देण्यात आले. केवळ स्त्रियांसाठी असणारे हे पहिले विद्यापीठ आहे.[१०] हे विद्यापीठ प्रामुख्याने स्त्रियांकडून चालवले जात असे व येथे स्त्रियांच्या सोयीसाठी मातृभाषेतून शिक्षण देण्याची व्यवस्था होती. गृहशास्त्र, वनस्पती शास्त्र, आरोग्यशास्त्र यासारखे विषय या विद्यापीठामध्ये सक्तीचे होते.

पंडीता रमाबाई ह्या स्त्री उद्धाराचे कार्य करीत होत्या. त्यांनी १८८२ मध्ये आर्य महिला मंडळाची स्थापना करून संपूर्ण भारतातील स्त्रीयांची अंधश्रद्धेतून होणाऱ्या अन्यायातून सुटका करण्यासाठी प्रयत्न सुरू केले. यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे काढून सोलापूर, बार्शी, पंढरपूर, नगर, ठाणे इत्यादी ठिकाणी आर्य महिला समाजाच्या शाखाची स्थापना केली. स्त्री उद्धाराचे कार्य करत असतानांच त्यांनी धर्मचिकित्सा केली आणि १८८३ मध्ये ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. ११ मार्च १८८९ मध्ये त्यांनी शारदासदनची स्थापना केली. विधवासाठी सुरू झालेल्या या शाळेतील विद्यार्थीनी आनंदीबाई जोशी ही पुढे बाया कर्वे म्हणजे महर्षी कर्वे यांच्या पत्नी बनल्या. शारदासदनचा भर महिलांना वाचन, लेखन, गणित, इतिहास, भूगोल, विणकाम, भरतकाम देऊन स्वावलंबी बनवणे यावर होता. स्त्रियांनी घराच्या बाहेर पडून धीटपणे पुरूष समुदायात वावरण्याची सवय लावणे, बाहेरच्या जगाचा परिचय घडवून देणे, त्यांच्यात आत्मविश्वास व व्यापक दृष्टी निर्माण करणे असे कार्य रमाबाईने केले. याच दरम्यान पुणे येथे प्लेगची साथ सुरू झाल्याने बाहेरून रूग्णांना पुण्यात आणण्यास सरकारने बंदी घातल्याने रमाबाईनी पुण्यापासून ३५ मैल दूर अंतरावर केडगाव येथे परप्रांतीय स्त्रियांना नेले. केडगावच्या १०० एकराच्या माळरानावर त्यांनी मुक्तीसदन ची स्थापना केली. पुणे येथील शारदासदन केडगाव येथे आणले.[११] या आश्रमात रमाबाई यांनी पुरूषाशिवाय आपण सन्मानाने जगू शकतो असा आत्मविश्वास महिलामध्ये निर्माण केला. पुढे कृपासदन, प्रितीसदन, बार्तमी सदन व सदानंद सदनची स्थापना करून समाजातील दीनदुबळ्या स्त्रीयांच्या उद्धारासाठी कार्य केले. त्यांचे हे कार्य तत्कालीन समाजाच्या पार्श्वभूमीवर महत्वाचे आहे. स्त्री उद्धाराचे प्रयत्न भारतात स्वातंत्र्यपुर्वकाळात सातत्याने होत आले आहेत. महात्मा फुले यांची स्वप्ने शाहु महाराजांनी आपल्या संस्थांनात साकारली. शाहु महाराजांना संस्थानाबाहेर जे करणे सहज शक्य नव्हते ते पुर्ण करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' संसदेत मांडून महिलांच्या हक्काविषयी प्रयत्न केले. हिंदू कोड बिल म्हणजे देशातील समस्त महिलांचेच नव्हे तर फुले आणि शाहू महाराजाचे स्वप्न होते. भारतीय संविधानातील स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही उद्दिष्टांना भारतातील जाती व्यवस्थाअंत आणि स्त्री पुरूष समानतेशिवाय अर्थ नव्हता. यामुळे 'हिंदू कोड' मध्ये सुधारणा होणे आवश्यक होते. परंतु सनातनी सामाजिक मानसिकतेमुळे 'हिंदू कोड बील' संमत होऊ शकले नाही.[१२] मात्र पुढे हळूहळू हिंदू कोड बिलातील सर्व तरतुदी स्वतंत्र कायदे करून स्विकारण्यात आल्या आहेत.

**स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्रातील महिला सबलीकरण**

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री-जीवनात मोठया प्रमाणात स्थित्यंतर घडून आली. गांधी यूगात स्त्रियांनी राष्ट्रीय आंदोलनात भाग घेतला.त्यातून त्यांच्या कार्याच्या दिशा विस्तारल्या गेल्या. या काळात सामाजिक सुधारणेबरोबरच स्त्री जागृतीला सुरुवात झाली.स्त्रियांनी सत्यागृहात व अन्य राजकीय चळवळीतून व त्यासंबंधीत कृतीतून सहभाग घेतला. कॉंग्रेसमधील संघटनेच्या चौकटीत राहून त्यांनी समाजवादी तत्वज्ञानाचा सेवादल व अन्य माध्यमातून प्रसार केला. स्त्रियांचा विद्यार्थी संघटनेत थोडाफार सहभाग सुरु झाला.डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या चळवळीतून



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

दलित स्त्रियांची सहभाग वाढला. स्त्रियांच्या जीवनात राजकीय स्थित्यंतरे आली. आधुनिक काळात विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीला आपल्या समस्यांची जाणीव होत गेल्याने त्या समस्या सोडविण्यासाठी त्याचेही प्रयत्न होत गेले. त्यांच्या संघटना उभारल्या गेल्या त्यामधून त्यांच्या चळवळी वाढीस लागल्या. सामाजिक जीवनात मोठे परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली.

**राज्य महिला आयोग**

महाराष्ट्र राज्यामध्ये स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून त्याबाबत योग्य उपाययोजना करणे, महिलांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या सनियंत्रण व अंमलबजावणी करणे, पहिला कल्याणासाठी शासनास सल्ला देण्यासाठी महिला आयोग स्थापन करण्यात आला आहे. या महिला आयोगामध्ये एक अध्यक्ष, सहा अशासकीय सदस्य, एक सदस्य सचिव, एक पदसिद्ध सदस्य म्हणून पोलीस महासंचालक प्रतिनिधी असतात.[१३] या आयोगातील पदाधिकारी व सदस्यपदी शक्यतो महिलांची नियुक्ती केली जाते. राज्य महिला आयोगाचा दर्जा हा एक स्वंयशासित संस्था असा आहे. या महिला आयोगास दिवाणी न्यायालयाचे अधिकार आहेत. महिलांची सामाजिक प्रगती आणि सक्षमीकरणासाठी महिला आयोगाचा दर्जा स्वतंत्र ठेवण्यात आला आहे. महिलांच्या संविधानिक अधिकाराचे रक्षण करणे आणि त्या संदर्भात आलेल्या तक्रारीची नोंद घेऊन न्यायालयीन प्रक्रियेचा अवलंब करत राज्य महिला आयोग चौकशी, तपासणी, फेरतपासणी, साक्षी पुराव्याचा पडताळा करून महिलांना न्याय मिळवून देत आहे.

**महिला धोरण**

महाराष्ट्र शासनाने महिलांच्या प्रश्नाचे स्वरुप लक्षात घेऊन त्यांची सोडवणूक करण्यासाठी जून १९९४ मध्ये राज्याचे पहिले महिला धोरण जाहीर केले. २००१ मध्ये दुसरे महिला धोरण जाहीर केले. २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण जाहीर केले.[१४] या महिला धोरणात पुरूषाच्या बरोबरीने मुलींनांही हक्क देण्याचा विचार केला आहे. समाजात स्त्री ही विविध अत्याचाराला बळी पडते. लैंगिक अत्याचार व कौटुंबिक हिंसाचार, बेकारी, महागाई, कुपोषण अशा अनेक संकटाला तिला सामोरे जावे लागते. त्यामुळे तिच्यावरील अन्याय, अत्याचार रोखणे, संरक्षण देणे, जीवनाच्या सर्व क्षेत्रातील विषमता नष्ट करून समानता प्रस्थापित करणे, स्त्रियांच्या बौद्धिक व व्यक्तिगत क्षमताचा विकास करून एक उत्पादक घटक म्हणून स्थान मिळवून देणे, गाव विकासात महिलांचा सहभाग वाढवणे, महिलांची आर्थिक उन्नती साधणे व तिच्या क्षमता संवर्धित करणे ही महिला धोरणाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी धोरणांतर्गत काही ठोस तरतुदी व कायदे करण्यात आले आहेत. मुख्यत: स्वयंसहायता गटाची निर्मिती, ग्रामसभा सक्रिय करण्यासाठी ग्रामसभेपूर्वी महिला ग्रामसभा घेण्याचे आदेश देण्यात आले. तसेच शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यामध्ये महिला प्रश्नाविषयी जाणीव जागृती करण्यासाठी विशेष प्रशिक्षणाची तरतुद करण्यात आली. परिणामी आज ग्रामीण भागात त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.

**महाराष्ट्रातील शैक्षणिक व नोकरीतील आरक्षण**

महाराष्ट्र महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी १९९४ मध्ये पहिले महिला धोरण तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी जाहीर केले. या धोरणाची अंमलबजावणी आजही शासकीय स्तरावर होत आहे. राज्यातील सर्व व्यावसायिक मुलींना मोफत शालेय शिक्षणाबरोबरच अभ्यासक्रमांसाठी ३० टक्के आरक्षण दिले आहे. यामुळे वैद्यकीय, अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, संगणकशास्त्र या क्षेत्रात त्यांचा सहभाग वाढला आहे. शासकीय सेवेत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. अशा अनेक उपाययोजनाच्या परिणामस्वरूप राज्यातील महिला शक्तीला बळ देण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सबलीकरणासाठीचे कायदे व योजना**

महिलांच्या शारीरिक, बौद्धिक व भावनात्मक गुणाची वृद्धी व्हावी, समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात विशेषतः आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात समान तत्व आणण्यासाठी शासन स्तरावर जाणीवपूर्वत प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी विविध योजनाची अंमलबजावणी केंद्र शासन व राज्य शासनाकडून केली जाते. केंद्र शासनाने महिलांच्या सबलीकरणासाठी अल्पमुदती निवास गृह, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वस्तीगृह, कौटुंबिक समुपदेशन केंद्र, प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रम, राष्ट्रीय महिला कोष, स्वावलंबन योजना, महिला व बालकाच्या व्यापारास प्रतिबंध, स्वयंसिद्धा, स्वाधार, बालिका समृद्धी योजना, जेंडर बजेटिंग, कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा २००५ अशा अनेक योजना व कायदे केले आहेत.

महाराष्ट्र शासनाने महिलांच्या सामाजिक व आर्थिक विकासाला गती देण्यासाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर महिला व बालकल्याण विभागाची निर्मिती केली. १९९९ मध्ये या विभागाचे नाव महिला व बालविकास विभाग असे करण्यात आले. समाजाचा एक महत्वाचा घटक असलेल्या महिलांच्या आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकास घडवून आणणे, हक्क व जबाबदारी याची जाणीव करून देणे, त्यांना नियोजन व निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, भारताच्या लोकतंत्र पद्धतीत त्यांना भागीदारी देणे म्हणजे खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होय. त्यादृष्टीने महाराष्ट्रात पुढील कायदे व योजना राबविल्या जातात. महिला संरक्षणगृहे, निराधार महिलासाठी स्वयंसेवा संस्थामार्फत आधारगृहे, माहेर योजना, अन्नपुर्णा योजना, व्यावसायिक प्रशिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन, हुंडानिर्मुलन समीती, जिजामाता महिला आधार वीमा योजना, स्वयंसिद्धा, महिला आर्थिक विकास महामंडळ, शालेय शिक्षण विभागाच्या योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या योजना, आरोग्य विभागाच्या योजना, सावित्रीबाई कल्याण योजना, मातृत्व अनुदान योजना, राष्ट्रीय पुनरूत्पादन व बालआरोग्य कार्यक्रम, सामाजिक न्याय, सांस्कृतिक व क्रिडा विभागाच्या योजना राबविल्या जातात.[१५]

**स्थानिक स्वराज्य संस्थामधील प्रतिनिधीत्व**

७३ व ७४ वी घटनादुरूस्तीने स्थनिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी ३३ टक्के राखीव जागा ठेवण्यात आल्या. २०११ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या सुधारित अधिनियमाने हे प्रमाण ५० टक्के झाले आहे.[१६] यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थात महिला प्रतिनिधीची संख्या वाढली आहे. त[illegible] समाज या

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli. Dist. Hingoli

... आहे. स्त्री–पुरुष समानतेच्या दृष्टीने हा निर्णय ... ठरला आहे.

महिला बचत गट च... महिला सबलीकरणासाठी विविध योजना व धोरणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न होत आहे. महिला सक्षमीकरणाचे अनेक मार्ग व ... आहेत. शासनाने या दृष्टीने अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली आहे. त्याचे दृश्य परिणाम दिसून येत आहेत. मुलींच्या शैक्षणिक विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजना राज्यात सुरु आहेत. ... महिलांचा शैक्षणिक दर वाढत असून गुणवत्तेच्या क्षेत्रातही मुली ... आहेत. आर्थिक क्षेत्रात महिला बचत गट चळवळ हा महिला सक्षमीकरणाचा एक प्रभावी मार्ग ठरला आहे. या माध्यमातून राज्यात ... एक नवी शक्ती निर्माण झाली आहे. या शक्तिला बळ देण्यासाठी ... महिलांसाठी व्यवसाय प्रशिक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला ... महिला बचतगटांना अत्यल्प दराने कर्जपुरवठा करण्यात येत आहे.

निष्कर्ष

१) महिला सबलीकरणाची प्रक्रिया ही विसाव्या शतकात गतिमान बनली असली तरी या प्रक्रियेची सुरुवात काही शतकापूर्वी झाली आहे.
२) भारतात स्त्रीमुक्ती चळवळीची सुरुवात राजा राममोहन रॉय यांच्या कार्यापासून झाली.
३) महाराष्ट्रात स्त्रियांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी महात्मा जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी इ.स.१८४८ मध्ये पुणे येथे मुलींची शाळा सुरु केली.
४) महिला कल्याणासाठी शासनास सल्ला देण्यासाठी महिला आयोग स्थापन करण्यात आला आहे.
५) महिला सबलीकरणासाठी विविध योजना व धोरणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम बनवण्याचा प्रयत्न होत आहे.
६) स्थानिक स्वराज्य संस्थामधील प्रतिनिधीत्व महिला सबलीकरणासाठी महत्वाचे ठरले आहे.
७) आर्थिक क्षेत्रात महिला बचत गट चळवळ हा महिला सबलीकरणाचा एक प्रभावी मार्ग ठरला आहे.

सारांश

महिला सबलीकरणासाठी विविध योजना व धोरणाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम बनविण्याचा प्रयत्न होत आहे. महिला सक्षमीकरणाचे अनेक मार्ग व ... गेले आहेत. शासनाने या दृष्टीने अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली आहे. त्याचे दृश्य परिणाम दिसून येत आहेत. मुलींच्या शैक्षणिक विकासाला प्रोत्साहन देणाऱ्या अनेक योजना राज्यात सुरु आहेत. यामुळे महिलांचा शैक्षणिक दर वाढत असून गुणवत्तेच्या क्षेत्रातही मुली अग्रेसर आहेत. आर्थिक क्षेत्रात महिला बचत गट चळवळ हा महिला सक्षमीकरणाचा एक प्रभावी मार्ग ठरला आहे. या माध्यमातून राज्यात स्त्रियांची एक नवी शक्ती निर्माण झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५० टक्के महिलांना प्रतिनिधीत्व दिल्याने राज्याच्या निर्णयप्रक्रियेत आणि विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढला आहे. शासनाचा हा निर्णय महिला सबलीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला आहे.

संदर्भ


१. देशपांडे, शैलेंद्र., (२०१३), समकालीन जागतिक राजकारण, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, सुधारित दुसरी आवृत्ती, २०१३
२. खडसे,प्रा.सुनिता., खडसे,प्रा.संतोष, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया,पुणे,शुभम पब्लिकेशन,१३
३. देशपांडे, शैलेंद्र., (२०१३), समकालीन जागतिक राजकारण, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स, सुधारित दुसरी आवृत्ती, २०१३
४. कीर, धनंजय., (१९९५), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र शासन, मुंबई,१९९
५. कांबळे,उत्तम.,(२००३),राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती, पुणे, सुगावा प्रकाशन, २५.
६. पवार डॉ.जयसिंगराव, माळसाहेब., (संपादक),( २००७) राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, द्वितीय आवृत्ती, १४२४
७. पवार डॉ.जयसिंगराव, माळसाहेब., (संपादक),( २००७) राजर्षी शाहू महाराज स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, द्वितीय आवृत्ती, १४२४
८. आपटे, ज.ना., (२०१९) महाराष्ट्रातील स्त्री विकासाची वाटचाल, योजना, ५३
९. प्रा.सुनिता.,खडसे प्रा.संतोष, ऐतिहासिक परिप्रेक्ष्यातील स्त्रिया, पुणे, शुभम पब्लिकेशन,४२
१०. अहलुवालिया, हरविंदर., (२०११) आर्थिक स्वातंत्र्याकडे वाटचाल, योजना,वर्ष ३९, ६१
११. कैलोडे, पांडेय, भगवानराव.,(२०१२),डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, पुणे, सुगावा प्रकाशन, १२
१२. भारताचे संविधान, भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय कार्य मंत्रालय, महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालयाद्वारे अनुवादित आणि संचालक शासनमुद्रण, लेखनसामुग्री महाराष्ट्र राज्य, सहावी आवृत्ती (सुधारित), २००७, ९
१३. करहाडे डॉ.प्रभा,महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण-फलश्रुती, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, ओव्हरी, पुणे, यशदा, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, आवृत्ती, २०१९, २३
१४. करहाडे डॉ.प्रभा,महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण-फलश्रुती, यशवंतराव, पुणे, यशदा, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, ओव्हरी, हिंदी, २०१९, २३
१५. चव्हाण, रविंद्र (संपादक),(२०१९) महाराष्ट्रातील पंचायत राज, खंड २, पुणे, यशदा, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी,
१६. चव्हाण, रविंद्र (संपादक),(२०१९) महाराष्ट्रातील पंचायत राज, खंड २, पुणे, यशदा, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी,


***

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli, Dist. Hingoli